अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - १६३ ■ शनिवार दि.१ मार्च २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 163 ■ Saturday Dt. 1 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

### शहरात दुचाकी चोरीच्या घटना घडल्या

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात दुचाकी चोरीच्या घटनेत वाढ झाली असुन शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून हॉटेल सम्राट येथून तर सावतामाळी चौक येथून एक दुचाकी लंपास झाल्याची घटन घडली असुन या प्रकरणी वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. शहरातील हॉटेल सम्राट येथून उमेश श्रीराम येडे यांची दुचाकी क्रमांक एम.एच.२३.एल.५२६९ तर अंबादास भाऊराव कवचट या सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची संत सावतामाळी चौकात घरासमोरून एम.एच.२३.यु.३९९० ही दुचाकी अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. शहरात मागील काही दिवसांपासून दुचाकी चोरीच्या घटनेत वाढ झाली असुन शहर व शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दुचाकी चोरीच्या घटनेत वाढ झाली आहे. याकडे पोलीस प्रशासन गांभीर्यान लक्ष देईल का ? दोन्ही प्रकरणी कलम ३०३ अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

### भरदिवसा वृध्द महिलेस लुटले

परळी । प्रतिनिधी

संभाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंद्याने धुमाकूळ घातल्यानंतर आता दिवसाढवळ्या लुटारू लुटू लागले आहेत. ६५ वर्षीय वृध्द महिलेला तीन ते चार जणांनी रोखून तिच्या कमरेला असलेली पिशवी ओरबाडून त्याामध्ये ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यासह नगदी रक्कम लुटून नेली. परळी शहरातील धनगर नगर येथील कोंडाबाई लिंबाजी सरोदे (वय ६५ वर्षे) शेतातून काम करून मोंढा परिसरात काही तरी घेण्यासाठी आली असता. तीन ते चार जणांनी तिला घेरले आणि ती वृध्द महिला घाबरून गेली आणि तिच्या कमरेलाङ्कङ्कलावलेली पिशवी, त्याामध्ये असलेले साडेसहा ग्राम सोने आणि सातशे रूपये लुटून या लुटारूंनी त्याा ठिकाणाहून पोबारा केला. भरदिवसा घडलेल्या या घटनेने परळी शहरात खळबळ उडाली असून, पोलिसांचा वचक परळीत निर्माण होणार तरी कधी ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.


# आका ठरला मास्टरमाईंड

## संतोष देशमुख हत्या प्रकरणात दाखल आरोपपत्रात कराड आरोपी नंबर एक



बीड । प्रतिनिधी

अवघ्या राज्याला हादरवून सोडणाऱ्या बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याा प्रकरणात ८० दिवसांमध्ये आरोपपत्र पोलिसांकडून दाखल करण्यात आले आहे. या आरोपपत्रामधून वाल्मीक कराड हाच संतोष देशमुख यांच्या हत्याा प्रकरणाचा सुत्रधार असल्याचं पोलिसांनी दाखल केलेल्या दोषारोपपत्रातून सिद्ध झाले आहे. त्याामुळे वाल्मीक कराड भोवती आता कारवाईचा फास पूर्णतः आवळला गेला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपपत्र एका वृत्तवाहिनीच्या हाती लागलं असून यामध्ये संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणामध्ये प्रमुख आरोपी म्हणून वार्मिक वाल्मीक कराडचा उल्लेख करण्यात आला आहे.



या आरोप पत्रामध्ये विष्णू साठे दोन नंबरचा आरोपी आहे. संतोष देशमुख यांची हत्या ही पूर्णतः खंडणी वादामधून झाल्याचे आरोपपत्रातून सिद्ध झालं आहे. आवादा कंपनीकडे खंडणी मागितली होती आणि या खंडणीनंतर झालेल्या बादामध्ये संतोष देशमुख यांची अपहरण करून हत्या करण्यात आली. २९ नोव्हेंबर रोजी मुदर्शनच्या फोनवरूनच चाल्मीक कराडने खंडणीची मागणी केली होती. त्यानंतर सहा डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांचा सुदर्शन घुले, प्रतीक घुले आणि सांगळे याच्याशी वाद झाला होता. ही माहिती आता पाच गोपनीय साक्षीदारांच्या बाबानंतर कराडविरुद्ध पुरावे मिळाले आहेत. त्यामुळे आता या प्रकरणांमध्ये वाल्मीक कराड हाच प्रमुख सुत्रधार असल्याचे स्पष्ट झालेलं आहे. गेल्या प्रत्योक दिवसांपासून खंडणी ट्रॉसिटी आणि हत्याा या प्रकरणावरून अवधा महाराष्ट्रात राज्याचे राजकारण ढवळून निघालं आहे. त्याामुळे आरोपपत्रामध्ये तिन्ही घटनांचा एकत्रित उल्लेख करण्यात आला आहे.

दरम्यान, संतोष देशमुख यांना सुदर्शन घुले मारहाण करतानाचा व्हिडिओ सुद्धा सीआयडीच्या हाती लागला आहे. एसआयटी प्रमुख बसवराज तेली, तपास अधिकारी किरण पाटील तसेच खंडणी प्रकरणाचे तपास अधिकारी अनिल गुजर पाटील यांनी बीडच्या न्यायालयामध्ये संतोष देशमुख खून प्रकरणाचे चार्जशीट दाखल केलं आहे. यावेळी सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे उपस्थित होते. गेल्यावर्षी ९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांची डोणगाव टोलनाक्यावरून अपहरण करून हत्याा करण्यात आली होती. या प्रकरणात आतापर्यंत नऊपैकी आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे. एक आरोपी कृष्णा आंधळे अद्यापही फरार आहे.

मागील ८० दिवसांत सीआयडी तसेच एसआयटीच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासानंतर हे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणावरून राजकीय आरोप प्रत्याारोप देखील होत होते. परंतु, दुसरीकडे सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी आपला तपास वेगाने पूर्ण करत दोषारोपपत्र दाखल केले आहे. आता न्यायालयीन प्रक्रिया सुरू राहणार आहे. दरम्यान ८० दिवसांच्या आत हे प्रकरण न्यायालयात दाखल झाल्याने आता आरोपींना जामीन सुद्धा मिळणे कठीण होणार आहे. या सर्व प्रकरणात सरकार पक्षाची बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ वकील ॲड. उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



# धारूर परीक्षा केंद्रावर इंग्रजीचा पेपर फुटला

## दोघांना पोलिसांनी घेतले ताब्यात

बीड, धारूर । प्रतिनिधी

एसएससी बोर्ड दहावीच्या परीक्षा सध्या सुरु आहेत. १ मार्च शनिवार रोजी इंग्रजीचा पेपर असल्याने शिक्षण विभागाकडून विशेष खबरदारी घेतल्यानंतरही दोन मुलांनी साडेअकरा वाजता इंग्रजीचा पेपर खिडकीतून घेऊन पलायन केले. पेपर फुटल्याची बातमी सर्वत्र चविने चर्चिली जात असतानाच पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी अतिशय शिताफीने अवघ्या अर्ध्या तासात पेपर फोडणाऱ्या दोघांनाही ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवत फोडलेला पेपर जमा करून घेतला.

बोर्ड परीक्षा मागील काही वर्षात धारूर शहरात शांततेत आणि व्यवस्थित पार पडत होत्याा. परंतु यंदा सध्या सुरू असलेल्या एसएससी बोर्ड दहावीच्या १ मार्च शनिवार रोजी होत असलेल्या इंग्रजी पेपर काही पोरांनी फोडल्याची घटना धारूर शहरातील जिल्हा परिषद शाळेतील परीक्षा केंद्रावर घडली. सदरील बाबीची माहिती मिळताात पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी अवघ्या अर्ध्या तासात सीताफिने त्याा पेपर फोडणाऱ्या पोरांना ताब्यात घेऊन पोलीसी खाक्या दाखवत पेपर उपलब्ध करून घेतला. परंतु बोर्ड परीक्षा त्याातच इंग्रजी चा पेपर अर्धा ते पाऊण तासात फुटला असल्याने पालकांमधून आता संभ्रम निर्माण झाला आहे. धारूर तालुका शिक्षणाधिकारी मनोज कोल्हे यांनी पेपर फोडणाऱ्या आरोपीवर योग्य ती कारवाई केली जाईल आणि सदरील पेपर फुटलेल्या प्रकाराची शिक्षण विभागातील वरिष्ठांना माहिती दिली असल्याचे त्याांनी बोलताना सांगितले.

### धारूर केंद्रावर इग्रजी पेपर फुटी प्रंकरणी दोन जन ताब्यात : पोलीस निरीक्षक वाघमोडे

धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा येथे इंग्रजी विषयाचा दहावीचा पेपर पुढल्या प्रकरणी दोघा तरुणांना आम्ही ताब्यात घेतले आहे या पाठीमागे आणखीन साकळी आहे का? याचा सखोल तपास करून योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल, असे धारूर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे यांनी केले.

# ग्रा.पं. सदस्यासह युवकांचे मोबाईल टॉवरवर आंदोलन

## आर्वी गावातील जलजीवन पाणीपुरवठा योजना विरोधात पुकारले होते आंदोलन



शिरूर कासार । प्रतिनिधी

तालुक्यातील आर्वी या गावासाठी मंजूर जलजीवन पाणीपुरवठा योजनेचे काम नियमबाह्य होत असून योजना थातूरमातूर करून ग्रामस्थांच्या तोंडाला पान पुसण्याचा प्रकार चालू असल्याने ग्रामपंचायत सदस्यांकडून प्रशासनाला अल्टिमेटम देऊन मोबाईल टावर वर चढून आत्मा दान करण्याचा इशारा एक महिन्यापूर्वी प्रशासनाला दिला होता प्रशासनाकडून यावर कुठलेही कार्यवाही न केल्याने युवक आंदोलनावर काम राहिले व एक एप्रिलच्या रोजी सकाळी युवक टावर वर चढले होते.

बोगस जलजीवन पाणीपुरवठा योजनेची चौकशी करून योजना दर्जेदार करावी व योजनेतून टाळलेल्या वस्त्याांवर पाणीपुरवठा पाईपलाईन करावी या मागणीसाठी ग्रामपंचायत सदस्यांनी प्रशासनाच्या विरोधात आंदोलनाचे हत्याार उपसले होते एक एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास ग्रामपंचायत मधील सदस्य गोपाल भुसारे, गणेश भोसले,अरुण देवकाते, बळीराम मंडलिक, बप्पासाहेब काळे, उपसरपंच अरुण कुंभारकर सह रामेश्वर नागरगोजे, आयुब शेख व नितीन घरगिने हे युवक मोबाईल टावर वर चढले होते तब्बल तीन तासानंतर प्रशासकीय अधिकारी या ठिकाणी दाखल झाले होते, आंदोलन स्थळावर सरपंच मीरा यादव, ग्रामसेविका सीमा खेडकर, शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश धोकृट, बिट अंमलदार जोगदंड यांच्यासह नायक तहसीलदार शिवनाथ खेडकर हे सर्व अधिकारी सकाळी नऊ वाजल्यापासून आंदोलन स्थळावर तळ ठोकून होते. पावणे बारा वाजण्याच्या सुमारास प्रशासकीय अधिकारी या ठिकाणी आले व आंदोलकांची समजूत काढून लेखी आश्वासन देऊन आंदोलन मागे घेण्यात आले.

**प्रशासकीय अधिकाऱ्यांनी एक महिन्याचा मागितला कालावधी**

आर्वी गावातील जलजीवन योजनेचे रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठ्याचे उपअभियंता शेख एम.ए, सातपुते एन.बी,ङ्गएल डी हूले, या अधिकाऱ्यांनी संबंधित गुत्तदाराला सूचना देऊन रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी एक महिन्याचा अवधी आंदोलनकर्त्याकडून लेखी स्वरूपात घेतलेला आहे व आंदोलन करताना प्रशासकीय अधिकाऱ्यांनी एक महिन्याच्या आत गावचा पाणीपुरवठा सुरळीत करण्याची संमती यावेळी दिली.

**ज्येष्ठ समाजसेवक दीपक नागरगोजे यांनी अधिकाऱ्यांना धरले धारेवर**

आर्वी ग्रामपंचायत चा कारभार जेष्ठ समाजसेवक दीपक नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे गावातील जलजीवन पाणीपुरवठा योजनेस संदर्भात चक्क ग्रामपंचायत सदस्यांना आंदोलनाची वेळ येत असेल तर प्रशासकीय अधिकारी करतात तरी काय असा सवाल ज्येष्ठ समाजसेवक दीपक नागरगोजे यांनी आंदोलन स्थळावर उपस्थित अधिकाऱ्यांना विचारून धारेवर धरले होते.

# स्वस्त धान्य दुकानात आता गव्हाऐवजी ज्वारीचे वाटप

## साहेब, फुफाटा असलेल्या ज्वारीची भाकरी खायची तरी कशी?

गेवराई । प्रतिनिधी

फेब्रुवारीपासून गेवराई तालुक्यातील २५७ स्वस्त धान्य दुकानातून गव्हाऐवची ज्वारीचे वाटप करण्यात येत आहे. दरम्यान, वाटप होत असलेल्या ज्वारीत फुफाटा अन्? पिठ व किडे व किडकी ज्वारी वाटप होत असलेल्या तक्रारी रेशन धारकांकडून होत असल्याने काही कार्डधारक ज्वारी ऐवजी तांदूळच द्या अशी मागणी दुकानदार यांच्याकडे करत असून, मग साहेब फुफाटा असलेल्या ज्वारीची भाकरी खायची तरी कशी अशा प्रतिक्रिया रेशन धारकांत होत आहेत. शासनाच्या वतीने स्वस्त धान्य दुकानातून कार्डधारक यांना मोफत तांदूळ अन्? गहू देण्यात येत होता. मात्र, या फेब्रुवारी महिन्यापासून आता गव्हाऐवजी ज्वारी वाटप करण्याचा निर्णय शासनाच्या पुरवठा विभागाने घेतला असून, त्यााप्रमाणेच गेवराई तालुक्यातील शहरातील व ग्रामीण भागातील गावखेड्यातील स्वस्त धान्य दुकानात ज्वारीचा पुरवठा करण्यात आला आहे. सद्यपरिस्थितीत दुकानदार यांच्याकडून रेशन वाटप करण्यात येत आहे. पहिल्यांदाच रेशनवर वाटप होणारी ज्वारी ही निकृष्ट असल्याच्या तक्रारी शिधापत्र्ाक लाभधारकांतून होत आहेत. दरम्यान, स्वस्त धान्य दुकानातून वाटप होत असलेल्या ज्वारीत फुफाटा,किडे अन्? किडकी असल्याने साहेब भाकरी खायची तरी कशी अशा प्रतिक्रिया गेवराईच्या ग्रामीण भागातील गावखेड्यातील रेशन धारकांत व्यक्त होत आहेत. सदरील ज्वारी खाण्यायोग्य नसल्याने चांगल्या प्रतीची खाण्यायोग्य ज्वारीचे वाटप करण्यात यावे अशी मागणी देखील शिधापत्रधारक लाभार्थी यांच्याकडून होत आहे.

> “ शासनाने स्वस्त धान्य दुकानातून ज्वारी वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार गेवराई तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानात फेब्रुवारीत ज्वारीचा पुरवठा करण्यात आला आहे. मात्र, ज्वारी निकृष्ट दर्जाची आहे अशी तक्रार एक ही शिधापत्र्ाधारकांची आलेली नाही.
> – गजानन मोरे, नायब तहसीलदार, पुरवठा विभाग गेवराई

### २५७ स्वस्त धान्य दुकानाअंतर्गत ४८ हजार शिधापत्रक लाभार्थी

गेवराई तालुक्यात एकुण २५७ स्वस्त धान्य दुकाने आहेत. या दुकाना अंतर्गत अंत्योदय योजनेत पाच हजार ६६० तर प्राधान्य कुटुंब योजनेत ४२ हजार ६७१ असे एकुण ४८ हजार ३३१ शिधापत्रधारक आहेत.

# बीडमध्ये ड्युटी, नको रे बाबा

## पोलिस अधिकाऱ्यांची आता बदलीसाठी फिल्डिंग

बीड । प्रतिनिधी

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड जिल्ह्यातील राजकीय गुन्हेगारी चर्चेचा विषय बनली आहे. या घटनेनंतर बीड पोलिस दलातील काही अधिकारी आणि त्यांच्या कामगिरी देखील संशयाच्या भोवऱ्यात आली. पोलिसांच्या कार्यपद्धतीकडे देखील त्याच नजेरतून पाहिले जाऊ लागले आहे. त्यामुळे बीड जिल्हा पोलिस दलातील अधिकारी अस्वस्थ असून, जिल्ह्यात नोकरी नको रे बाबा, असे म्हणत तब्बल १०७ अधिकाऱ्यांनी बदलीसाठी अर्ज केले आहेत.

बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्यााप्रकरण चांगलेच गाजर आहे. या प्रकरणात दोषारोपपत्र देखील न्यायालयात दाखल झाले आहे. या गुन्ह्यातील आरोपी अटकेत आहे. मंत्री धनंजय मुंडे यांचा निटकवर्तीय वाल्मिक कराड हा या हत्योचा कटात असल्याचा संशय आहे. त्यामुळे बीडमधील राजकीय गुन्हेगारी चर्चेत आली आहे.

गेल्या ८८ दिवसांपासून बीड जिल्ह्यातील या हत्येच्या प्रकरणामुळे राज्य ढवळून निघाले आहे. मंत्री धनंजय मुंडे यांचे राजकीय करिअर यामुळे धोक्यात आले आहे. धनंजय मुंडे महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात असेल, तरी याच हत्येच्या प्रकरणामुळे त्यांना बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाची संधी हुकली. तसेच लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर बीड जिल्ह्यात जातीवाद वाढला आहे.

या हत्येप्रकरणामुळे मंत्री धनंजय मुंडे यांचा अटकेत असलेला निकटवर्तीय वाल्मिक कराड याचा बीड जिल्हा बीड दलावर असलेला प्रभाव अजूनही चर्चेत आहे. तत्कालीन पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ यांची बदली आणि त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नवनीत कावत यांची नियुक्ती, हे सर्व काही सांगून गेली. नवनीत कावत यांनी पदभार स्वीकारल्यानंतर बीड पोलिस दलाची प्रतिमा सुधारण्यासाठी बराच प्रयत केला.

### पोलिस अधिकाऱ्यांचे विनंती अर्ज

बीड जिल्ह्यात एकूण २९ पोलिस ठाणे आहेत. या पैकी १५ ठाणेदारांचा बदलीसाठी अर्ज आहे तर पोलीस अधीक्षक कार्यालयअंतर्गत असलेल्या विशेष शाखेपैकी सहा जणांनाचा विनंती अर्ज आहे. पोलिस महासंचालक यांच्याकडे ५९ विनंती अर्ज तर छत्रपती संभाजीनगर विशेष पोलिस महानिरीक्षकांकडे ४८ विनंती बदली अर्ज आहेत.

### अजितदादांचा सज्जड दम...

बीड जिल्ह्यात जवळपास १०७ पोलिस अधिकाऱ्यांनी बदलीसाठी अर्ज केले आहेत. संतोष देशमुख यांच्या हत्योपूर्वी बीड जिल्ह्या काम करण्यासाठी अधिकाऱ्यांकडून पसंती मिळत होती. पण आता अचानक बदलीसाठी विनंती अर्ज आल्याने बीड जिल्हा पुन्हा एकदा राज्यात चर्चेत आला आहे. अजित पवार यांच्याकडे बीड जिल्ह्याचे पालकत्व आहे, या हत्योच्या घटनेनंतर आणि अजितदादांनी पालकत्व स्वीकारल्यानंतर चुकीच्या गोष्टी खपवून घेर नसल्याचा सज्जड दम देखील दिला आहे.



# बीड शहरातील अतिक्रमण हटाव मोहीम विधानसभेत झालेल्या पराभवाचा राग आहे

## नगरपालिका निवडणुकीत उध्वस्त झालेले छोटे मोठे व्यापारी पुन्हा एकदा यांना जागा दाखवतील

बीड । प्रतिनिधी

शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेत किती अपारमेंट तसेच मोठे शॉपिंग कॉम्प्लेक्स तसेच नगरपालिकेच्या मालकीच्या जागेत असलेल्या अतिक्रमण धारकांना बीड नगरपालिकेने नोटीस दिले आहेत याची माहिती सविस्तर सांगावी शहरात उभा राहत असलेल्या शोले जंग इमारती आहेत. यांच्या घरी जाऊन यांना बांधकाम परमिशन दिली जाते. अंधारे मॅडम यांचा अंधार प्रशासनाला दिसत नाही का? बीड शहरामध्ये सध्या अतिक्रमण हटाव मोहीम चालू आहे. यामध्ये सर्वसामान्य मुस्लिम दलित अल्पसंख्याक समाजातील लोक आहेत जे कुटुंबाला जगण्यासाठी रस्त्याच्या बाजूला जागा मिळेल तिथे थोड्याफार प्रमाणात स्टॉल टाकून व्यवसाय करून कुटुंबाला जगवत आहेत. बीड नगरपालिकेची एक हाती सत्ता गेली तीस वर्षापासून आहे. कोणत्याही व्यापाऱ्यासाठी व्यावसायिकांसाठी शहरांमध्ये उद्योग उभारण्यासाठी व्यवसाय करण्यासाठी जागा उपलब्ध बीड नगरपालिका करू शकली नाही. बीड नगरपालिकेच्या मालकीच्या आणि हक्काच्या ओपन फेस वर आजपर्यंत धन दांडग्यांनी मोठमोठ्या नामांकित लोकांनी अतिक्रमण केला आहे. यांना नोटीस नाही कारवाई नाही बीड जिल्हा कारागृह परिसर असेल किंवा नगर सुभाष रोड असेल सारडा संकुल असेल किंवा बार्शी रोड असेल नामांकित लोकांनी केलेल्या अतिक्रमणावर कोणतीही कारवाई होत नाही.

नियमबाह्यरित्या बांधकाम परमिशन दिल्या जातात. नेमबाह्यरित्या सर्व काम केले जातात



लीगली काम करणाऱ्यांना मात्र नगरपालिकेमध्ये अडवलं जात आहे बीड नगरपालिकेतील कारभार अतिशय चुकीच्या पद्धतीने चालू आहे अतिक्रमण करणाऱ्या लोकांवर निश्चितपणे कारवाई करावी मात्र जे छोटे मोठे व्यावसायिक काम करत आहेत व्यवसाय करून आपलं कुटुंब जगत आहेत अशा लोकांची व्यवस्था बीड नगरपालिकेने केली पाहिजे शॉपिंग कॉम्प्लेक्स असेल किंवा भाजी मंडी मार्केट या ठिकाणी नगरपालिका आणि नगरपालिकेचे मालक असलेल्या मर्जीतल्या लोकांना गेल्या पन्नास वर्षापासून जागा दिलेले आहेत त्या जागेचा कधी लेखाजोखा होणार आहे का किती वर्षाचे करार होते काय होते कोणी करार करून दिलेले आहेत कोणाच्या नावावर जागा आहेत सध्या कोणाच्या ताब्यात आहेत म्हणजे नगरपालिकेतील नगरपालिकेच्या हक्काच्या ओपन पेस आणि शॉपिंग कॉम्प्लेक्स एकाच व्यक्तीच्या नावावर अनेक वर्षापासून आहेत. त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही परंतु रस्त्याच्या कडेला रहदारीस कोणताही अडथळा येत नसलेल्या छोट्या मोठ्या व्यवसायिकांना महिना दोन महिन्याला अतिक्रमण हटाव मोहिमेच्या नावाखाली बीड नगरपालिकेचे मालक तोडफोड करत आहेत नुकसान करत आहेत विधानसभा निवडणुकीमध्ये झालेला पराभव त्यांच्या एवढा जिव्हारी लागला आहे कशाचा राग काढू आणि कशात नाही अशी परिस्थिती झाली आहे बीड शहरातील लोकांना पिण्यासाठी पाणी पंधरा ते वीस दिवस मिळत नाही रस्त्यावरील कचराकुंड्या जशास तसे आहेत. रस्त्यावरील लाईट बंद आहेत बीड शहरातील सिग्नल बंद आहेत या महत्त्वाच्या प्रश्नांवर बीड जिल्हाधिकारी असतील किंवा नगरपालिकेचे मुख्य अधिकारी असतील किंवा अन्य प्रशासन यांना काही देणंघेणं नाही सुभाष सोड सारख्या ठिकाणी पार्किंगची व्यवस्था नाही आहे स्टेडियम परिसरात पार्किंगची व्यवस्था नाहीये धोंडी पोरा परिसरात बीड नगर पालिकेला पार्किंगची व्यवस्था करता आली नाही बशीरगन सारख्या वरदळीच्या ठिकाणी सुद्धा पार्किंगची व्यवस्था बीड नगरपालिकेला आणि त्यांच्या मालकाला आजपर्यंत करताना आली या विषयांवर बीड नगरपालिका असेल मुख्याधिकारी असेल किंवा कलेक्टर असतील एकही शब्द बोलत नाहीत उलट रस्त्याच्या बाजूला गाड्या पार केल्या तर त्यांना दंड दिला जात आहे पावत्या फाडल्या जात आहे गाडी जप्त केली जात आहे. बीड नगरपालिकेचा कारभार हा बीड शहरातील लोकांसाठी अतिशय त्रासदायक होत आहे त्यामुळे येणाऱ्या नगरपालिका निवडणुकीमध्ये छोटे-मोठे व्यवसाय असतील व्यापारी असतील ज्यांच्या हातावर पोट आहे अशा लोकांचे उद्योग व्यवसाय तुम्ही उध्वस्त केलेले आहेत तुमच्या राजकारणाच्या स्वार्थापायी तुम्ही लोकांवर राग व्यक्त करत आहात येणाऱ्या निवडणुकीमध्ये हेच लोक हेच व्यापारी नगरपालिका निवडणुकीत तुम्हाला धडा शिकवतील असं प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात के.के. वडमारे यांनी म्हटले आहे.



## मंत्री सावे यांची लोकशाही पत्रकार संघाच्या शिष्टमंडळाने घेतली भेट

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास व अपारंपारिक ऊर्जा विभाग मंत्री मा.ना.श्री अतुल सावे यांची संभाजीनगर येथे लोकशाही पत्रकार संघाच्या शिष्टमंडळाने भेट घेतली.

यावेळी लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने मंत्रिमहोदयांचा सत्कार करून त्यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यासोबतच राज्यभरातील पत्रकार बांधवांचे विविध प्रश्न व मागण्यासंदर्भातले निवेदनही त्यांना देण्यात आले. मंत्रीमहोदयांनी आगामी काळात पत्रकारांचे प्रश्न सोडवण्यासाठी मी स्वत:पुढाकार घेईल, असा शब्द लोकशाही पत्रकार संघाच्या संपूर्ण टीमला दिला.

यावेळी लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष संदिप जाधव, प्रदेशाध्यक्ष प्रतापराव साळुंखे, राज्य उपाध्यक्ष आयेशा खान, राणी झिंजुर्डे व संघाचे संभाजीनगर जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

## वडखेल येथे ''एक दिवस गावकऱ्यांसोबत'' ग्राम दरबार उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी वैजनाथ तालुक्यातील नागरिकांनी परळी पंचायत समिती अंतर्गत व शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे अवाहन पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी शिवाजी मुंडे यांनी परळी पंचायत समितीच्या वतीने वडखेल येथे ''एक दिवस गावकऱ्यांसोबत'' ग्राम दरबार उपक्रमाच्या प्रसंगी बोलत होते. वडखेल येथे ''एक दिवस गावकऱ्यांसोबत'' ग्राम दरबार उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

याबाबत अधिक माहिती अशी की, भारतातील ६५% लोकसंख्या आजही ग्रामीण भागात राहत आहे. ग्रामीण भागातील पुनरुत्थानासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबविले गेले. महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील खेडी ही स्वयंपुर्ण, स्वयंशासीत असावीत अशी सर्व ग्रामस्थांची अपेक्षा असते. शासनाच्या विविध योजना, उपक्रम व सेवा ग्रामस्थांच्या दारी पोहचविणे हेच सुप्रशासनाचे लक्षण आहे. याच मुद्दावर आधारीत ग्रामीण भागात काम करणा-या सर्व विभागांच्या अधिका-यांमार्फत प्रत्योक गावामध्ये विविध सेवा ठराविक कालावधीत पोहचविण्याच्या अनुषंगाने ''एक दिवस गावकऱ्यांसोबत (ग्राम दरबार)'' हा नाविन्यापुर्ण उपक्रम छत्रपती संभाजीनगर विभागात राबविणे येत आहे. त्यानुषंगाने जिल्हा परिषद बीड व परळी वैजनाथ पंचायत समिती आणि ग्रामपंचायत कार्यालय वडखेल यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी रोजी ''एक दिवस गावकऱ्यांसोबत...'' हा ग्राम दरबार सारखा नवीन उपक्रम राबविण्यात आला. आज या ग्राम दरबाराच्या निमित्ताने सहाय्यक गटविकास अधिकारी शिवाजी मुंडे यांनी उपस्थित राहून ग्रामस्थांशी संवाद साधला तसेच त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. पंचायत समिती अंतर्गत व शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे अवाहन पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी शिवाजी मुंडे यांनी केले. शासनाच्या विविध विकास योजने विषयी पंचायत समिती मधील सर्व विभाग प्रमुख यांनी ग्रामस्थ मार्गदर्शन केले. याप्रसंगी ग्रामपंचायत, शिक्षण, कृषी, महिला व बालकल्याण, आरोग्य, पशुसंवर्धन, समाज कल्याण, पाणीपुरवठा, स्वच्छता, सिंचन व जलसंधारण या संदर्भातील अडचणींवर सविस्तर चर्चा केली. तसेच त्यावर तोडगा काढयासाठी कटीबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. शासनाच्या योजना प्रत्योक लाभार्थी पर्यंत पोहचविण्यात येणार आहे. जनहिताचा निर्णय घेवून पादर्शकपणे आयोजित केलेल्या या लोककल्याणकारी उपक्रमास ग्रामस्थ यांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.

यावेळी पंचायत समिती परळी चे सहाय्यक गट विकास अधिकारी शिवाजीराव मुंडे, पंचायत समिती धारूर सहाय्यक गट विकास अधिकारी श्री शेषेराव कांदे साहेब,विस्तार अधिकारी साहेबराव भताने, एस आर एल एम विभागाचे सचिन हरणावळ, विस्तार अधिकारी अंबोरे, घरकुल विभागाचे बुरकुले, एम आर इ जी चे कांदे व संजय जाधव पशुसंवर्धन विभागाचे डॉक्टर झिंगरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे रताकर देवकते, मुन्ना कराड तसेच सरपंच भारतबाई व्यंकटराव देवकते, उपसरपंच श्रीमती कौसाबाई चव्हाण ग्रामपंचायत सदस्य भागवत देवकते, अनुरथ खरात, भीमराव आगलावे, श्रीमती गंगाबाई घुमरे, लक्ष्मण गंगणे यांच्यासह विविध विभागाचे कर्मचारी उपस्थित होते विविध विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या योजेनेची माहिती गावातील उपस्थित नागरिकांना देण्यात आली व वडखेल गावात आलेल्या विविध अधिकारी कर्मचारी यांनी वडखेल गावात चालवल्या जाणाऱ्या उपक्रमाची माहीती घेऊन कामाबद्दल समाधान व्यक्त केले. या कर्यक्रमाचे सूत्रसंचलन पंचायत समितीचे विस्तार अधिकारी साहेबराव भताने यांनी केले तर आभार अंगद देवकते व गोविंद देवकते यांनी मानले.

## अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटना (जि.प) बीडची शिक्षण आयुक्तांकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार-२००९ च्या अनुषंगाने संचमान्यतेचे सुधारित निकष विहित करणे बाबत शासनाने २८ ऑगस्ट २०१५ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार व निकषाप्रमाणे संच मान्यता लागू करण्यात यावी तसेच शासनाने या शासन निर्णयाला बगल देत १५ मार्च २०२४ रोजी काढलेल्या शासन निर्णयाला रद्द करावे अशा मागण्या अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटना (जि.प) बीड कडून शिक्षण आयुक्तांना पाठविलेल्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

याविषयी पाठविलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,१५ मार्च २०२४ शासन निर्णयानुसार जी संच मान्यता लादण्यात आली आहे. ती जाचक व अन्यायकारक आहे. ह्या संचमान्यतेमुळे हजारो शिक्षक अतिरिक्त ठरत आहेत. बहुतेक शाळा बंद पडत आहेत. हजारो विद्यार्थ्यांचे नुकसान होत



आहे. ग्रामीण भागातील बऱ्याच शाळा बंद होणार आहेत. ६वी ते ८वी वर्गासाठी विद्यार्थ्यांना शुन्य (०) शिक्षक म्हणजे एकही शिक्षक मिळणार नाही. अर्थात ती शाळा आपोआप बंद होणार आहे.

शहरी भागातही खुप शाळा असल्यामुळे एक ही विद्यार्थी मिळणे कठीण आहे. या शासन निर्णयानुसार तर पद कायम ठेवण्यासाठी दुप्पट विद्यार्थी पाहिजे. मागील शासन निर्णयानुसार ६वी ते ८वी वर्गात ३७ विद्यार्थ्यांना तीन शिक्षक पदवीधर बसत होते. परंतु आताच्या नवीन शासन निर्णयानुसार तीन पदासाठी ७१ विद्यार्थी असणे आवश्यक आहे. जे शक्यच नाही.

संदर्भीय शासन निर्णय हा बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ चा विरोध करणारा आहे. म्हणून हा शासन निर्णय रद्द करावा. तसेच २८ ऑगस्ट २०१५ चा शासन निर्णय हा बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ ला अनुसरुन असल्यामुळे ह्याच कायद्यानुसार व २८ ऑगस्ट २०१५ ला काढलेल्या शासन निर्णयानुसार संच मान्यता कायम ठेवण्यात यावी. अशा मागण्या अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटना (जि.प) बीड चे कार्याध्यक्ष उस्मान खान, जिल्हाध्यक्ष काझी मुशाहेद आणि शेख इम्रान यांनी शिक्षण आयुक्तांना पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.



## वसंतराव नाईक अधिकारी, कर्मचारी संघटनेची जिल्हा कार्यकारणी जाहीर

बीड । प्रतिनिधी

येथील शासकीय विश्रामगृहात वसंतराव नाईक अधिकारी, कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. यात जिल्हा कार्यकारणीची निवड करण्यात आली. मराठवाडा कार्यकारणी निवड प्रमुख बाबासाहेब चव्हाण, मार्गदर्शक उत्तम राठोड, अर्जुन राठोड, आसाराम चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक होऊन वसंतराव नाईक अधिकारी, कर्मचारी संघटनेची बीड जिल्हा नुतन कार्यकारणी पुढील प्रमाणे जाहीर करण्यात आली.

यात जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण, उपाध्यक्ष राजेशकुमार राठोड, बी.टी.पवार, सचिव आबासाहेब राठोड, सहसचिव विजय चव्हाण, कोषाध्यक्ष अशोक राठोड, सल्लागार बाबासाहेब राठोड, जिल्हासंघटक ज्ञानेश्वर राठोड, प्रसिध्दीप्रमुख प्रकाश राठोड, कार्यकारणी सदस्य अविनाश राठोड, श्रीमंत राठोड, शिवाजी जाधव, विठ्ठल राठोड वरील प्रमाणे निवड करण्यात आली. नवीन पदाधिकाऱ्यांचा संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी लहु चव्हाण, अतुल चव्हाण, गोरख जाधव, एस.पी.राठोड, राजेश जाधव, परमेश्वर जाधव, सचिन पवार, प्रमोद राठोड, बळीराम जाधव, विष्णू राठोड यांच्यासह जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## देऊळगाव गात येथे कामगार एकता युनियन शाखेची स्थापना

सेलू । प्रतिनिधी

सेलू तालुक्यातील देऊळगाव गात या ठिकाणी कामगार एकता युनियनची शाखेची स्थापना झाली आहे. शाखा अध्यक्ष गोरख तांबे, उपाध्यक्ष मारोती कुचेकर, सचिव क्षेत्रगुण तांबे यांची निवड झाली आहे. कामगार एकता युनियन मागील ८ वर्षापासून विकासात्मक / शासन निर्णयातून वंचित राहिलेल्या घटकांसोबत कार्यरत आहोत. घरेलू महिला कामगार, पथविक्रेते, आणि नाका कामगार प्रस्थापित असंघटीत कामगार वर्गाला, कामगारांच्या अधिकाराची जाणीव करून देणे आणि अधिकार समजावून त्यांचे सक्षमीकरण करणे, ही महत्वाची भूमिका पार पाडत आहे. उपस्थित कामगार एकता युनियन जिल्हा अध्यक्ष अंकुश तांबे रतीव पाटील आणि सतीश लोंढे यांनी निवड झालेल्या कार्यकत्यांचे अभिनंदन केले.



## प्रतिक कांबळे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड शहर अध्यक्षपदी नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेने पत्रकार संघ अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतजी मुंडे आणि राज्य समन्वयक संतोषजी मानूरकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या बीड जिल्हा पत्रकार संघाच्या बीड शहर अध्यक्षपदी प्रतिक कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली असून जिल्ह्यातील सर्व शहर अध्यक्षांची नियुक्ती करण्यासाठी त्यांना प्रभारी करण्यात आले आहे.



प्रतिक कांबळे हे बीड पत्रकारितेमध्ये नवनिर्वाचित पत्रकार असून त्यांनी आपल्या प्रगल्भ लेखिनेने अल्पवधीतच वाचकांना आकर्षित केले आहे. याबरोबरच प्रतिक कांबळे हे बीडच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाने गाजलेले व्यक्तिमत्व आहे. याच सर्व बाबींचा विचार करून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतजी मुंडे आणि राज्य समन्वयक संतोषजी मानूरकर यांनी प्रतिक कांबळे यांच्यावर मोठ्या विश्वासाने बीड जिल्हा पत्रकार संघाच्या बीड शहर अध्यक्ष पदाची जिम्मेदारी सोपवली आहे. एवढेच नाहीतर त्यांना जिल्ह्यातील सर्व शहर अध्यक्षांची नियुक्ती करण्यासाठी प्रभारी केले आहे. याबद्दल प्रतिक कांबळे यांचे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्यावतीने अभिनंदन करण्यात आले आहे. याबरोरच प्रतिक कांबळे यांच्यावर बीडच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रातून अभिनंदन शुभेच्छांचा वर्षाव होतो आहे.




## कोरटकर विरोधात लिंबागणेशकरांचे जोडे मारो आंदोलन

लिंबागणेश । प्रतिनिधी

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल आक्षेपार्ह व बदनामीकारक वक्तव्य करून शिवप्रेमींच्या भावना दुखावणा-या नागपुरच्या प्रशांत कोरटकर यांना तात्काळ अटक करून त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि. ०१ शनिवार रोजी सकाळी ११ वाजता लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जोरदार घोषणाबाजी करत प्रशांत कोरटकर यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला.ईतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना मोबाईल वरून धमकी देताना प्रशांत कोरटकर यांने महाराष्ट्राची अस्मिता असलेले रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल हिनकस वक्तव्य केले असुन दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत देखील केला आहे.तसेच विकृत लेखक जेम्स लेन यांनी छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल अत्यांत विकृत लिखाणाचे समर्थन करून तमाम शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत. मराठा समाजाला शिविगाळ करून समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत केला आहे तसेच ईतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्याचे नाव घेऊन सदर व्यक्तीने हे वक्तव्य करत धमकी दिल्यामुळे हे प्रकरण अत्यांत संवेदनशील असुन तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत करण्यात आली आहे. यावेळी आंदोलनात राजेभाऊ आप्पा गिरे, सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती अध्यक्ष अशोक वाणी, विक्रांत वाणी,अँड.गणेश वाणी,बाळकृष्ण थोरात, भगवान मोरे ,लक्ष्मण वाणी, भालचंद्र गिरे, दादा गायकवाड, नामदेव वाणी, सौरभ जाधव,रताकर वाणी,संजय पावले, अशोक जाधव,पांडुरंग कानडे, कृष्णा कानडे, हनुमंत निर्मळ आदी सहभागी होते.

# पोलिस अधिक्षक साहेब सदरक्षणाय की पवनचक्की रक्षणाय

## महाराष्ट्र शासनाचा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांवर पवनचक्की कंपन्यांकडून खोटा गुन्हा

बीड । प्रतिनिधी

पोलिस अधीक्षक नवनित कांवत यांनी सौर ऊर्जा प्रकल्प व पवन ऊर्जा प्रकल्पाच्या कामकाजाच्या संबंधाने स्थानिक राजकीय पुढारी, स्थानिक शेतकरी व गावगुंड यांच्याकडून विविध कारणांसाठी होणारी अडवणूक करून कामकाज बंद पाडणे किंवा खंडणीची मागणी करणे या अनुषंगाने प्रकल्पातील अशा होणाऱ्या घटनांना आळा घालण्यासाठी नोडल अधिकारी यांची नियुक्ती केली आहे.

मात्र पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक व दडपशाही याविरोधात शेतकऱ्यांनी शासन दरबारी लेखी तक्रार करून दाद मागण्याचा प्रयत केला तर त्यांच्यावर गुन्हे दाखल होतात. जिल्हा प्रशासन त्यांची बाजु मुळात ऐकुनच घेत नाही. सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या बाबतीत बालाघाटावर अशा घटना घडलेल्या आहेत. यातच बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील महाराष्ट्र शासनाचा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांवर पवनचक्की कंपन्यांनी खोटा गुन्हा दाखल केला असुन त्यांना न्याय कधी मिळणार?? पोलिस प्रशासन पवनचक्की कंपन्यांचीच केवळ पाठराखण करत असुन पिडीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.

सौर ऊर्जा प्लेट टाकणार सांगुन रात्रीतून




पवनचक्की उभारली; अडवायचा प्रयत केला असता गुन्हे दाखल केले :- गणेश जगदाळे

बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील शेतकरी गणेश जगदाळे सांगतात आम्ही ७ जण भावंडे एकत्र कुटुंब पद्धतीत असुन आमच्या शेतालगत ९०० फुट अंतरावर फसवणूक करून पवनचक्की उभारण्यात आली आहे. अगोदर आम्हाला सौर ऊर्जा प्रकल्पाच्या प्लेटी लावणार असल्याचे सांगण्यात आले.नंतर रात्रीतुन मोठमोठ्या वाहनातुन पवनचक्की साहित्या आणण्यात आले.आम्ही अडवण्याचा प्रयत केला असता आमच्यावर पोलिस प्रशासनाकडून गुन्हे दाखल करण्यात आले. पवनचक्की कंपन्यांच्या कापर तारांमुळे जमिनीतील पाण्याची पातळी घटली. आमच्या शेतात सध्या शंभरच्या वर दुधदुभते जनावरे आहेत. पवनचक्की सुरू झाल्यावर आम्हाला सगळं सोडून जायची पाळी येणार आहे. आम्हाला सन २०१३ मध्ये महाराष्ट्र शासन कृषी व पणन विभाग सन्मानपत्र वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार मिळालेला आहे.गेल्या महिन्यात १३ जानेवारी दरम्यान बीड जिल्ह्यातील प्रगतशील शेतकरी असणाऱ्या ७ जणांना पुणे येथे नेण्यात आले होते.त्याात आमचा समावेश होता. मात्र पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे आम्ही अडचणीत आलो असुन जिल्हा प्रशासन व न्यायालयात दाद मागत आहोत. आम्हाला न्याय कधी मिळणार?

जिल्हास्तरीय व उपविभागीय स्तरीय संनियंत्रण समित्याा कागदावर ; पिडीत शेतकऱ्यांना वाली कोण? त्यांना न्याय कोण देणार ? :- डॉ.गणेश ढवळे

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ आक्टोबर २०१३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय नियंत्रण समित्याांची स्थापना केलेली आहे. या समित्याांना पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे तसेच पवन ऊर्जा प्रकल्पाचे निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यावहारिक व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे पवन ऊर्जा प्रकल्प बाबत समितीकडे आलेल्या तक्रारीची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करणे. आणि जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पाचे अनुषंगाने उद्धवणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे. त्याचप्रमाणे शेतजमीन मालक, शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासात यांच्यामध्ये समन्वय ठेवणे. प्रकल्प उभारणीसाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावर सर्व प्रकारचे सहकारी सहाय्य करणे इत्यादी अधिकार त्यांना दिलेले आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि पोलीस अधीक्षक हे सदस्य आहेत.

त्याचप्रमाणे तालुका स्तरावर सनियंत्रण समितीमध्ये उपविभागीय अधिकारी अध्यक्ष तर तहसीलदार समन्वयक अथवा सचिव आहेत .मात्र या समित्याा केवळ कागदावर असून पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे जिल्हा प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. असे असतानाच पोलीस अधीक्षक बीड यांनी पवनचक्की व सौर ऊर्जा प्रकल्प अधिकाऱ्यांची पाठराखण करणे म्हणजे एक प्रकारे त्यांच्या मनमानी कारभाराला दिलेले सूट असून पिडीत शेतकऱ्यांना न्याय कोण देणार? पीडित शेतकऱ्यांचे तक्रारी कोण ऐकणार ? असा सर्वात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.



महाराष्ट्र सरकार द्वारे शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त पै. बाळासाहेब आवारे यांच्या जय हनुमान आखाडा, पाटोदा येथे पै. बाजीराव चव्हाण (युवासेना मराठवाडा निरीक्षक) व पै. बहिरवाल यांच्यात कुस्तीचा रोमांचक डाव रंगला. या जुगलबंदीचा आनंद घेताना युवासेना मराठवाडा सचिव निलेश शिंदे, युवासेना मराठवाडा युवती निरीक्षिका आकांक्षा ताई चौगुले, युवासेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव व इतर प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते. पै. बाळासाहेब आवारे यांच्या स्वखर्चाने चालवलेल्या या तालमीत अनेक उत्कृष्ट मल्ल तयार झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे सुपुत्र अर्जुन पुरस्कार विजेते राहुल आवारे यांनी ४० हून अधिक आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धामध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत देशाचा झेंडा उंचावला आहे.

## अखिल भारतीय मागासवर्गीय समाज प्रबोधन संस्थेच्या मुलींचे सुयश

मुंबई । प्रतिनिधी

अखिल भारतीय मागासवर्गीय समाज प्रबोधन संस्था संचलित आदिवासी कातकरी मुला मुलींची अनुदानित आश्रमशाळा बाबरे, ता. शहापूर या आश्रमशाळेतील विद्यार्थीनी कुमारी रोहिणी जाधव व कुमारी गौरी पारधी या मुलींनी स्नेहश्री फाउंडेशन या संस्थेमार्फत आयोजित केलेल्या राज्यस्तरीय संविधान प्रास्ताविका पाठांतर स्पर्धेमध्ये यश मिळविले. प्रित्यार्थ महाराष्ट्र राज्याचे समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते शिवसेना भवन येथे सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास मंत्रालयाचे प्रधान सचिव विजय वाघमारे व उपसचिव रविंद्र जाधव यांना आदर्श कृतशिल मुख्याध्यापिका आशा नवनाथ रणखांबे यांनी विद्यार्थिनी समवेत भेटून शाळेची माहिती दिली. विशेष म्हणजे यांच्या पहिल्या पिढीने पुस्तकाला हात लावला आहे. आजही त्यांचे पालक विटभट्टीवर काम करीत आहेत. आम्हाला आय. ए. एस आय. पी. एस व्हायचे आहे अशी महत्तकांक्षाही व्यक्त केली. या दोन्ही विद्यार्थिनींचे सचिवांनी कौतुक केले.

## तेजस्विनी ग्रुपकडून महिलांना धुलिवंदनानिमित्त मनोरंजनाची खास मेजवानी!

# तेजस्विनी ग्रुप आयोजित बीडमध्ये रंग बरसे होली कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

चूल आणि मूल या विचारांच्या पलीकडे जाऊन महिलांनी स्वअस्तित्व निर्माण केले पाहिजे. दैनंदिन जीवनाच्या जिम्मेदारीतून कधीतरी मोकळं होऊन काही क्षण स्वत:साठी जगले पाहिजे यासाठी बीडमधील महिला वर्गात बहुचर्चित असलेल्या तेजस्विनी ग्रुपकडून महिलांना धुलिवंदनानिमित्त मनोरंजनाची खास मेजवानी मिळणार आहे.



दि.१४ मार्च २०२५ रोजी सकाळी ११. ०० ते ४. ०० वाजता रामकृष्ण लॉन्स, कॅनॉल रोड, बीड येथे बीडमधील महिलांकरिता तेजस्विनी ग्रुप आयोजितरंग बरसे होली या कार्यक्रमाचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले असून हा कार्यक्रम केवळ आणि केवळ महिलांच्याच उपस्थितीत पार पडणार आहे आणि विशेष म्हणजे या कार्यक्रमात महिलांच्या सुरक्षेचा पूर्ण विचार करून महिलांसाठी स्पेशियल सुरक्षा गार्ड ची व्यवस्था करण्यात आली आहे. तेजस्विनी ग्रुप आयोजित बीडमध्ये रंग बरसे होली या कार्यक्रमात सहभागी महिलांना स्वादिष्ट जेवण, लाईव्ह डीजे, वेलकम ड्रिंक, प्रोफेशनल अँकर, सेल्फी पॉईंट, फुड स्टॉल, हायजेनिक कलर, विविध गेम्स आणि बक्षिसे ठेवण्यात आली आहेत तर सरप्राईज अशा सेलिब्रिटीची भेट देखील या कार्यक्रमात होणार आहे.

रंग बरसे या कार्यक्रमात महिलांना सहभागी होण्याकरिता ७०२०४१९४७० या मोबाईल क्रमांकावर संपर्क करून नाव नोंदणी करायची आहे. धमाल मस्ती आणि फुल एन्जॉय असलेल्या रंग बरसे होली स्पेशल कार्यक्रमात महिलांनी जास्तीतजास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन तेजस्विनी ग्रुपच्या संस्थापिका सोनलताई पाटील यांनी केले आहे.

## गोरगरीब जनतेची माऊली डॉ.सारिकाताई : प्रा.शिवराज माने

बीड । प्रतिनिधी

स्वता:हाच्या जिवापेक्षा जास्त कार्यकर्त्यांवर जीव ओवाळून टाकणारे नेतृत्व म्हणजे ताई जर एखादा कार्यकर्ता किंवा गोरगरीब अडचणीत सापडला तर मदतीला धावून येणारे नेतृत्व...! ताईसाहेब सत्तेच्या खुर्चीवर कोण आहे याहीपेक्षा आपलं काम आश्वासकरित्याा कोण करू शकतं ? याच अंदाज घेत लोक अशा नेत्याांकडे आपले सुख दु:ख सांगतात.



अर्थात केवळ लोकांचं सांगणंच नाही तर नेत्याानं ते ऐकून घेत ते प्रश्न तितक्याच तीव्रतेने सोडवण्याचा प्रयत करणंही महत्त्वाच असतं..! अशा वेळी समोर एक नाव येत... ते म्हणजे आदरणीय ''डॉ. सारिकाताई योगेश क्षीरसागर..!'' जातीभेदाला बिल्कुल थारा न देणारं नेतृत्व म्हणजे ताई..! ताईसाहेबांचा प्रवास सर्वांनी जवळून पाहिला आहे. अनेकजण पाहत आहेत. राजकारणात सामाजिक जीवनात काम करायचं असेल तर सर्वात महत्त्वाचे असते ती ''भूमिका,निर्णय आणि विश्वास'' ह्या तिन्ही गोष्टींचा संगम जर कोणाकडे असेल तर तो डॉ. सारिकाताई यांच्याकडे आहे.



बहुजन समता पार्टीचे राज्य उपाध्यक्ष डॉ विजय चांदणे साहेब यांची कोपार्डे ता.करवीर येथिल हनुमान विकास सेवा सोसायटी ला सदिच्छा भेट.... जिल्हा सरचिटणीस आप्पासाहेब कांबळे, जिल्हा कार्याध्यक्ष सागर बुरूड, सरपंच विठ्ठल पाटील, अण्णा नाथाजी वाकरेकर अनंता जामदार बाळू शिंदे, संजय पाटील, गणेश गुरव व इतर मान्यवर उपस्थित होते.

# डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'रानरांगूळ' कथासंग्रहाचे प्रकाशन



शिरूर कासार । प्रतिनिधी

शेतीमाती, रोजगार आणि वर्तमान जीवनाचे दाहक प्रश्न मांडणारे डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'रानरांगूळ' या कथासंग्रहाचे प्रकाशन विधान परिषद सभापती आ. नीलम गोऱ्हे, बालभारतीचे किरण केंद्रे, साहित्या अकादमी पुरस्कार प्राप्त एकनाथ आव्हाड, संगीता बर्वे, भाऊ तोरसेकर, घनश्याम पाटील, संदीप वाघचौरे यांचे हस्ते ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्या संमेलनात दिल्ली येथे तालकटोरा स्टेडियमवर झाले.

वर्तमानकाळात ऊस, कापूस, शेतमालाचे आणि शेतीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. वाढती महागाई, शिक्षण, आरोग्य, रोजगार या विवंचनेत समाज आहे. यासंबंधी कथांच्या माध्यमातून शोषितांचे होणारे शोषण आणि धनाढ्याचे होत असलेले पोषण यासाठी 'रानरांगूळ' कथासंग्रह महत्तत्पूर्ण ठरतो. शिरूरचे साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या मराठवाडी ग्रामबोलीचा परिपोष जपलेल्या 'रानरांगूळ' या कथासंग्रहाचे प्रकाशन दिल्ली येथे संपन्न झालेल्या ८९ व्या अ.भा.म.सा. संमेलनात यशवंतराव चव्हाण सभामंडपात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्यासपीठावर संपन्न झाले. विधान परिषद सभापती आ. नीलम गोऱ्हे, बालभारतीचे किरण केंद्रे, साहित्या अकादमी पुरस्कार प्राप्त एकनाथ आव्हाड, साहित्या अकादमी पुरस्कार विजेत्याा संगीता बर्वे, पत्रकार भाऊ तोरसेकर, चपराक प्रकाशनचे घनश्याम पाटील, शिक्षणतज्ज्ञ संदीप वाघचौरे , सरहद फाऊंडेशनचे संजय नहार यांचे हस्ते झाले. याप्रसंगी महेश मोरे, देवीदास फुलारी, प्रा. किरण सगर, बापू दासरी, संतोष तांबे, संजीवनी जाधव, शैलजा कारंडे यांचेसह मान्यवर साहित्या रसिकांची उपस्थिती होती. तर 'रानरांगूळ' ची निर्मिती स्टोरीमिरर मुंबई साठी रोशन म्हस्के यांनी तर ज्येष्ठ साहित्यिक जगदीश कदम यांनी पाठराखण केली आहे.

# टाकरवन येथे राबवला ग्राम दरबार उपक्रम

## सरकारी कार्यालयाची पाहणी, शेकडो योजनेची ग्रामस्थांना दिली माहिती

टाकरवन । प्रतिनिधी

पंचायत समिती माजलगाव व ग्रामपंचायत कार्यालय टाकरवन यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील टाकरवन येथे दि.२८ शुक्रवार रोजी ग्राम दरबार उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून शेकडो योजनेची माहिती दिली.एक दिवस गावकऱ्यांसाठी अभियाना दरम्यान गावातील शेकडो महिला पुरुषांनी उपस्थित राहून सरकारी योजना आणि फायदे समजावुनन घेतल्या.

विभागीय आयुक्त संभाजीनगर यांच्या आदेशानुसार प्रत्योक तालुक्याातून एक ग्रामपंचायतीची निवड करून ग्राम दरबार उपक्रम राबवण्यात आला.या अभियानांतर्गत माजलगाव तालुक्यातील टाकरवन या एकमेव ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली होती. शुक्रवारी सर्व प्रशासन गावात पोहोचले. दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.ज्योत्सना प्रकाश मुळीक (मा. गटविकास अधिकारी प.सं. माजलगाव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



उपस्थित होत्याा.कृषी विभाग. शिक्षण विभाग .महिला व बालकल्याण विभाग. आरोग्य विभाग . पशुसंवर्धन विभाग . समाज कल्याण विभाग . पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग. सिंचन व जलसंधारण विभाग.बॅक.विभाग आदी विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी सर्व सरकारी योजनेची माहिती गावकऱ्यांना दिली. सरकारच्या अनेक योजना नागरिकांना माहीत नाहीत किंवा त्याांच्यापर्यंत पोहोचत नाहीत.सरकारची प्रत्योक योजना आणि त्याचे फायदे नागरिकांना महिलांना माहिती व्हावेत आणि गावाच्या व नागरिकांच्या समस्या मार्गी लागाव्यात विविध योजनेच्या माध्यमातून कुटुंब सुधारावेत या मुख्य उद्देशाने एक दिवस गावकऱ्यांसाठी अभियानातून ग्राम दरबार उपक्रमाचे आयोजन केले आहे.

या उपक्रमामुळे नक्कीच टाकरवन करांचा फायदा होईल असे मत गटविकास अधिकारी ज्योत्सना मुळीक यांनी व्यक्त केले. त्याानंतर जिल्हा परिषद शाळा प्राथमिक आरोग्य केंद्र ग्रामपंचायत कार्यालय अंगणवाडी आधी ठिकाणी त्याांनी पाहणी करून समस्या जाणून घेतल्या.गावकरी प्रशासनामध्ये तब्बल तीन तास संवाद झाला दरम्यान अनेक समस्या अधिकाऱ्यांनी समजून घेतल्या व ग्रामस्थांनी अनेक योजनेची माहिती जाणून घेतली.यावेळी ग्रामविकास अधिकारी नाईक.सरपंच सुनील तौर. उपसरपंच दयानंद गोबरे. आजी माझी सरपंच विविध संस्थेचे संचालक ग्रामपंचायतचे सर्व सदस्य गावकरी महिला आणि सर्व विभागाचे विभाग प्रमुख अधिकारी उपस्थित होते.भोजनाच्या आस्वादाने कार्यक्रमाचा समरोप झाला.

# शिक्षणाधिकारी यांच्यामुळे सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यावर उपासमारीची वेळ!

## बीड जिल्ह्यात भ्रष्टाचाराची परिशीमा गाठलेल्या जि.प. माध्यमिक शिक्षण विभागाचा सावळा गोंधळ कधी थांबणार : प्रा. सत्येंद्र पाटील

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी श्री नागनाथ शिंदे हे मागील काही दिवसापासून शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे फिरकत नसल्यामुळे सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या प्राध्यापक शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या फाईलसवर सह्या झाल्या नाहीत. त्यामुळे या सर्व सेवानिवृत शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव कार्यालयातच धुळखात पडले आहे. केवळ शिक्षणाधिकारी श्री शिंदे यांची स्वाक्षरी न झाल्याने सेवानिवृत्त झाल्यानंतर त्या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची नामुष्की ओढवली जाऊ शकते. तेंव्हा शिक्षणाधिकारी श्री शिंदे यांनी मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात शिक्षकांच्या असणारे सर्व प्रश्न आणि सेवानिवृत्त होत असलेल्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित राहिलेले सेवानिवृत्तीचे प्रस्ताव तातडीने मार्गी लावावे अन्यथा शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शिक्षक नेते सत्येंद्र पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून दिला आहे.

या पत्रकात प्रा. सत्योंद्र पाटील सर म्हणतात की फेब्रुवारी महिन्यामध्ये बारावी आणि दहावीच्या परीक्षेला सुरुवात झाली आहे. या परीक्षेचे कारण पुढे करत माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी श्री. नागनाथ शिंदे हे शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे फिरकलेच नाहीत. या काळात जिल्हाभरातून कामासाठी येणाऱ्या शिक्षक, प्राध्यापकांना शिक्षणाधिकारी दौऱ्यावर गेले एवढेच उत्तर मिळते, दरम्यान या कालावधीत सेवानिवृत्त होत असलेल्या अनेक प्राध्यापक शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आपल्या सेवानिवृत्तीच्या फाईल कार्यालयात दाखल केलेल्या आहेत. काही प्राध्यापक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आपले सेवानिवृत्तीचे प्रस्ताव कार्यालयात दाखल करायचे आहेत परंतु हे प्रस्ताव दाखल करून घ्यायला शिक्षण विभागामध्ये एकही कर्मचारी नाही, मग आमचे प्रस्ताव पुढे कसे जाणार? सेवानिवृत्ती तारखेच्या पूर्वी किमान तीन महिने सेवानिवृत्तीचा प्रस्ताव दाखल केला तरच सेवा निवृत्तीचे वेतन वेळेवर मिळते अन्यथा निवृत्ती नंतर निवृत्ती वेतन न मिळाल्याने त्याा कुटुंबाची ओढाताण होऊ शकते. त्याा कुटुंबाच्या होणाऱ्या आर्थिक ओढाताणीस जबाबदार कोण? ज्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव मंजूर होऊन आले, त्यांना मिळणाऱ्या ग्रॅज्युएटीच्या रक्कमेच्या प्रक्रियेवर काम कोणी करायचे एक नव्हे असे असंख्य प्रश्न शिक्षण विभागामध्ये निर्माण झाले आहेत.



दुसरीकडे ज्या प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रस्ताव दाखल केले आहेत. त्याा प्रस्तावावर शिक्षणाधिकारी शिंदे यांची स्वाक्षरी होणे गरजेचे आहे. परंतु शिक्षणाधिकारी श्री नागनाथ शिंदे यांना शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे येण्यासाठी व सह्या करण्यासाठी वेळ मिळत नाही. या संदर्भात त्यांच्याशी वेळोवेळी संपर्क साधण्याचा प्रयत केला परंतु ते उपलब्ध होऊ शकले नसल्याने सध्या बीडच्या माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी फरार झाले की काय? असा संतप्त सवाल ही या वेळी शिक्षक नेते प्रा. सत्योंद्र पाटील सर यांनी उपस्थित केला आहे. त्याचबरोबर संपूर्ण फेब्रुवारी महिन्यामध्ये जर शिक्षणाधिकाऱ्यांना कार्यालयाकडे येण्यासाठी वेळ मिळत नसेल तर शिक्षण विभागामध्ये किती सावळा गोंधळ सुरू आहे हे लक्षात येते.

त्यामुळे याबाबत आपण या जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी संपर्क साधून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी करणार असल्याचे प्रा सत्योंद्र पाटील सर म्हणाले. तसेच मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये शिक्षणाधिकारी श्री शिंदे साहेब यांनी तातडीने कार्यालयात हजर राहून शिक्षकांचे असलेले सर्व प्रश्न सोडवावेत, सेवानिवृत्त होत असलेल्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या फाईलवर सह्या करून त्यांना सेवानिवृत्तीचे सर्व लाभ त्यांच्या पदरात पाडून द्यावेत अन्यथा शिक्षणाधिकारी श्री शिंदे साहेब यांच्या कार्यालयासमोर शेकडो सेवानिवृत्त प्राध्यापक शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी प्रा. सत्येंद्र पाटील यांनी दिला आहे.

# कांबळे मॅडम यांच्या आशीर्वादाने इंजिनियर लांडे मलिदा घेऊन पुन्हा सोडले बोगस घरकुल हप्ते

■ तक्रार देऊनही वरिष्ठांच लांडेंना पाठबळ ■ नियम फक्त गरिबाला, पैसे वाल्याला घर न बांधता हप्ते ■ सामाजिक कार्यकर्ते उपोषणास बसणार

तलवाडा । प्रतिनिधी
गेवराई पंचायत समिती कार्यालयातील कंत्राटी इंजिनिअर विशाल लांडे यांनी नियमाला केराची टोपली दाखवत पंतप्रधान आवास योजना, तसेच मोदी आवास योजना या गोरगरीब जनतेसाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही योजना लागू करण्यात आली आहे मात्र लांडे यांनी या योजनेचे कागदी घोडे नाचू मलिद्या पायी जो तीन हजार रुपये देईल त्याला हप्ता इकडे तुम्ही घरी ही बांधू नका असा राज रोजपण चालू असून भ्रष्ट पंचायत समिती अशा इंजिनियर व कारवाई करत नसून लवकर सामाजिक कार्यकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयावर उपोषणास बसणार आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा तसेच परिसरात इंजिनियर लांडे हे लाभार्थ्यांनी घर पाहून घराच्या बांधकाम नुसार किती रक्कम सोडायची हे देखरेखी साठी नियुक्त केलेले आहे. इंजिनिअर विशाल लांडे यांनी कसलीही खातर जमा न करता साधा कुणी पायाही खदला नसताना अशा लाभार्थ्याला लिनटल लेवल दाखवून तिसरा हप्ता सोडल्याचे उघडकीस येत असून तर काही लाभार्थ्यांना फाउंडेशन लेव्हल दाखवून दुसरा हप्ता सोडल्याचेही ऑनलाइन द्वारे उघडकीस आले असून वरील सोडलेले हप्तानुसार असे ५० ते ६० लाभार्थी अकाउंट वरती पैसेही जमा झाले आहे.




**जिल्हाधिकारी पाठक साहेब यांच्याकडून इंजिनिअर कडून बोगस सोडलेले हप्ते वसूल करून कारवाई करण्याची मागणी**

इंजिनीयर लांडे यांनी असेच केले तर नियम फक्त गरिबालाच का काही दिवसापूर्वी गटविकास अधिकारी कांबळे मॅडम यांना चौकशीसाठी निवेदनही देण्यात आले होत. मात्र कांबळे मॅडम यांनी कसल्याही प्रकारची खातर जमा न करता इंजिनीयर विशाल लांडे यांना अशी बोगस काम करण्यास सांगितले का? असा प्रश्न सर्वसामान्यातून पडत असून गटविकास अधिकारी कांबळे मॅडम साधे एका तक्रारीची सुद्धा चौकशी करू शकत नाहीत का? का इंजिनियर लांडे यांनाच पाठबळ देण्याचे काम करत आहेत का? असे अनेक प्रश्न गटविकास अधिकारी यांच्या बद्दल ग्रामस्थातून होत आहे असं पाहून गेवराईची पंचायत समिती बिहारची पंचायत समिती झाली का तरी या प्रकरणाची सखोल चौकशी करून ज्या लाभार्थ्यांचे बोगस पिले सोडले आहे असे जिओ टॅग करणारे इंजिनियर यांनी कुठले फोटो काढले.

ज्या लाभार्थ्यांनी अक्षरश विट सुद्धा लावली नाही आशांच्या नावावर सतर हजार रुपये जमा कसे होतात पी टी आर एकच असे प्रकारे बोगस जियो टॅग करून मलिदा जमा करण्याचे काम इंजिनीयर लांडे यांनी केले असून तरी याची चौकशी होऊन सर्व रक्कम इंजिनियर करून वसूल करण्यात यावी यासाठी लवकरच पंचायत समिती किंवा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्ते उपोषणास बसणार आहेत.



## मनसेचे नगरपालिकेसमोर बोंब मारो आंदोलन

# भोंगळ कारभाराचे काढले वाभाडे!

बीड । प्रतिनिधी
बीड नगरपालिकेच्या भोंगळ कारभाराचा फटका सर्व सामान्य बीड शहर वासियांना बसत आहे. पाणी साठा मुबलक प्रमाणात असताना वीस दिवस आड पाणी पुरवठा केला जातो. शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले असून यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर घातक परिणाम होत आहे शहरातील बहुतांश भागात पथदिवे बंद असल्याने अंधाराचे साम्राज्य पसरले आहे तर शहरात मोकाट जनावरांचा मुक्त संचार वाढला आहे. बीड नगर पालिकेने तत्काळ या सर्व मागण्याकडे लक्ष देऊन सोडवण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला राज्य उपाध्यक्ष वर्षातील जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेच्या दारात संबळ आंदोलन करण्यात आले.

मुख्याधिकारी हटाव नगरपालिका बचाव, पाणी आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा विजय असो यास राज ठाकरे यांच्या विजयाच्या घोषणा देत महाराष्ट्र निर्माण सेनेचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते. आंदोलनाची पूर्व सूचना देऊनही मुख्याधिकारी नीता अंधारे या नगरपालिकेत आल्या नसल्याने महिला आंदोलन चांगल्या संत आपल्या होत्याा. भ्रष्ट प्रशासनाचे करायचे काय खाली मुंडके वर पाय म्हणत अधिकारी नीता अंधारे यांच्या निषेधार्थ घोषणा देण्यात आल्या.

**मुख्याधिकारी हटाव ; बीड बचावच्या घोषणांनी परिसर दणाणले**

यावेळी महिलांनी डोक्यावर मटकी ठेवत नगरपालिके प्रशासनाचा निषेध केला. आंदोलकांचे निवेदन स्वीकारण्यासाठी बीड नगरपालिकेचे कार्यकारी अभियंता कदम यांनी निवेदन स्वीकारत सर्व मागण्या लवकरच पूर्ण करण्याचे प्रशासनाकडून वचन दिले.

या आंदोलनामध्ये महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वर्षाताई जगदाळे यांच्यासह जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव बिडवे शहराध्यक्ष अमरजान पठाण महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष कल्पना कवठेकर, आशा कुटे, नीता अडागळे, यांच्यासह महाराष्ट्र निर्माण सेनेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.



# प्रशिक्षण घेतल्यानंतर उद्योग सुरु करावा – दत्तात्रय क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी
तुलसी फॅशन ड्रेस डिझाईन महाविद्यालय, बीड येथे जिल्हा उद्योग केंद्र पुरस्कृत महाराष्ट्र उद्योजक्ता विकास केंद्र, बीड आयोजित विशेष घटक योजने अंतर्गत ड्रेस डिझाईनिंग प्रशिक्षण कार्यक्रमाचे उदघाटन महाराष्ट्र उद्योजक्ता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर, प्राचार्य अशोक धुलधुले, प्रशिक्षक भागवत वैद्य, प्रोफेसर किशोर वाघमारे, राज मस्के, अंकिता जाधव यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी उद्योग कसा करावा यासंदर्भात अनेक उदाहरण देत एक संधी उपलब्ध करून दिली. नौकरी च्या अनेक संधी आहेत. त्यासोबत स्वतः चा उद्योग सुरु करू शकतो. असे आपल्या उदघाटन प्रसंगी प्राचार्य अशोक धूलधुले म्हणाले.

दत्तात्रय क्षीरसागर आपल्या अध्यक्षनीय भाषणात म्हणाले की उद्योग, उद्योजक, आणि उद्योजक्ता विकास काय आहे. अशी माहिती देत प्रशिक्षण घेऊन नौकरी च्या तर संधी आहेत. पण आपण एक स्वतः चा उद्योग सुरु करावा. आज प्रत्येक जण फॅशनबल राहणीमान आवडते ह्या खूप संधी आहेत. आपण आपला ड्रेस डिझाईनिंग केला पाहिजे. या मध्ये आपल्या घरच्यांना सुद्धा सहभागी करून घेतले पाहिजे.

यावेळी मोठ्या संख्येने विध्यार्थी उपास्तीत होते. या कार्यकर्माचे सूत्रसंचालन प्रोफेसर किशोर वाघमारे यांनी केले तर आभार राज मस्के यांनी मांडले.

# एकही शाळा बंद पडू देणार नाही

शिरूर कासार । प्रतिनिधी
शिक्षक निर्धारणामुळे शाळांचे अस्तित्व संकटात मराठवाड्यातील तीन हजार शिक्षक अतिरिक्त ठरण्याची भीती काळजी करू नका. नवीन शिक्षक निर्धारणानुसार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा मधील शिक्षक संख्या मोठ्या प्रमाणात कमी होणार असून मराठवाड्यातील काही जिल्ह्यातील जिल्हा परिषद च्या शाळांमधील शिक्षकांची संख्या हजारांच्या आसपास कमी होणार असल्याचे सांगण्यात येते त्यामुळे गोरगरिबांच्या मुलांच्या शिक्षणाचा हक्काचे केंद्र असणाऱ्या जी.प. शाळा आस्तीत व धोक्यात येण्याची शक्यता आहे. संच मान्यतेच्या नवीन धोरणानुसार शासनाच्या शिक्षक विभागाकडून जाहीर करण्यात आलेले शिक्षक निर्धारणानुसार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमधील शिक्षक संख्या मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. संचमान्यता गरिबांच्या मुलांच्या शिक्षणाकरिता अन्यायकारक ठरणार असल्याने त्याबाबत शासन निर्णय रद्द करण्यात यावा अशी मागणी शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांच्याद्वारे करण्यात आली आहे.



यापूर्वी इयत्ता सहावी ते आठवीला ३६ विद्यार्थ्यांसाठी तीन शिक्षक मान्य होते मात्र या प्राथमिक १९१८ राज्य नवीन संच मान्य नुसार त्याकरिता ७८ पटसंख्या असणे आवश्यक आहे ज्या शाळेत वर्ग ६ ते ८ मध्ये एकूण २० पेक्षा कमी विद्यार्थी आहेत तेथे शून्य शिक्षक मान्य करण्यात आलेले आहेत. या विद्यार्थ्यांना आता दाखले घेऊन दुसऱ्या शाळेत जावे लागणार आहे असे शिरूर तालुक्यामध्ये तरी होऊ देणार नाहीत. शिरूर तालुक्यातील प्रत्येक शाळा पूर्वजत चालू ठेवावीच लागणार आमचे पूर्वज वेडे नव्हते त्यांनी वस्ती शाळा किंवा प्रत्येक गावात जिल्हा परिषद ची शाळा चालू केली ते पागल नव्हते तुम्ही आले शहाणे शाळा बंद करायला असं होऊ देणार नाही त्यामुळे राज्यात समाजशास्त्र व भाषा विषयाच्या पदवीधर शिक्षकांचे हजार पदे कमी होणार असून असंख्य शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत नवीन संचमान्यता नुसार भविष्यात बहुतेक शाळांमध्ये इयत्ता ६ ते ८ साठी दोनच शिक्षक राहणार असून त्यांच्यावर अतिरिक्त तासिकांचा भार वाढणार आहे.

या महायुतीच्या सरकारने जर असं केलं तर शिवसेनेच्या वतीने तीव्र स्वरूपाचं आंदोलन करण्यात येईल आणि त्याचा पडसाद महाराष्ट्र भर सुरुवात होईल आणि ती सुरुवात शिरूर कासार शहरातूनच होईल तालुक्यातूनच होईल त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होईलच तसेच भविष्यात उच्च प्राथमिकचे वर्ग बंद पडण्याची शक्यता निर्माण होणार आहे असे कदापी शिवसेना होऊ देणार नाही संच मान्यतेनुसार व ते निर्धारण करताना आधार लिंक नसलेले विद्यार्थी दाखवण्यात आले नाहीत अपडेट नसलेले विद्यार्थी आधार लिंक प्रक्रियेत आले नाहीत त्यामुळे मराठवाड्यातील जवळपास ३००० ते ४००० शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता आहे आधार लिंक साठी मुदतवाड द्यावी व शाळेतील प्रत्यक्ष हजेरीवरील विद्यार्थी संख्या ग्राह्य धरण्यात हाच यावर पर्याय आहे असे मुळातच शाळेच्या बाबतीत होऊ देणार नाहीत जिथे दोन मुले असतील तिथे देखील ती शाळा चालूच ठेवण्यात येईल हा शिवसेनेचा इशारा समजावा शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांनी दिला आहे.

# अवैध वाळू उपसा करणाऱ्या दोन हायवावर कारवाई

## चकलांबा पोलिसांची कामगिरी; एक कोटीचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी
गुन्हेगारीवर जरब बसविण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासन ॲक्शन मोडवर आहेत. दि.२८ रोजी पहाटे गेवराईच्या पोलिसांनी गोदावरी नदीच्या पात्रातुन अवैध वाळू उपसा करून वाहतूक करणाऱ्या दोन हायवावर चकलांबा पोलिसांनी कारवाई करून एक कोटीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

बीड जिल्ह्यातील अवैध धंदे, वाळूची चोरी तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणारे गुन्हेगार याच्या विरोधात पोलीस अधीक्षक नवनित कॉवत यांनी कडक कारवाईच्या सुचना जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यात दिलेल्या आहेत. त्यानुसार चकलांबा पोलिसांनी सुरळेगाव (ता. गेवराई, जि. बीड) गोदावरी नदीच्या पात्रातुन वाळू चोरी करत असलेल्या दोन हायवावर कारवाई केली. या हायवा ताब्यात घेत असताना वाळू माफीयांशी पोलिसांची हमरीतुमरी झाल्याने एका पोलिस कर्मचाऱ्याच्या हाताला ईजा झाली.



तरीही पोलिसांनी या हायवा ताब्यात घेऊन साधारण एक कोटीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, गेवराईचे पोलिस उपविभागीय अधिकारी निरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनात चकलांबा पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक संदिप पाटील यांच्या पथकाने सदरील कारवाई केली आहे.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT